रुपयाचे अवमूल्यन म्हणजे अर्थव्यवस्थेची कमजोरी नव्हे!

केंद्र सरकारचा युक्तिवाद

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

अमेरिकी डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपयाचे मूल्य ढेपाळणे हे अर्थव्यवस्थेच्या सुमार स्थितीचे लक्षण नसून, त्यासंबंधाने व्यक्त केल्या जाणाऱ्या चिंता सरकारने मंगळवारी फेटाळून लावली. देशाचे व्यापक आर्थिक आधार मजबूत आहेत आणि आर्थिक घडामोडींमध्ये सातत्य व मजबूती दिसून येत आहे, असा सरकारने युक्तिवाद केला.

राज्यसभेतील एका प्रश्नाला लेखी उत्तर देताना, अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी स्पष्ट केले की, रुपयाचा विनिमय दर अनेक देशांतर्गत आणि जागतिक घटकांवर अवलंबून असतो. यामध्ये डॉलर निर्देशांकातील चढ-उतार, भांडवलाचा ओघ, व्याजदर, खनिज तेलाच्या किमती आणि चालू खात्यातील तूट यांसारख्या घटकांचा समावेश होतो.

त्यांनी नमूद केले की, रुपयाच्या विनिमय दराला प्रभावित करणाऱ्या प्रतिकूल घटकांचा छायेतही भारतीय अर्थव्यवस्था मजबूत स्थितीत आहे. त्यांनी सांगितले की, गेल्या तीन वर्षांत वास्तविक सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) सातत्याने ७ टक्क्यांहून अधिक दराने वाढले आहे. मजबूत देशांतर्गत मागणी, कंपन्यांची भक्कम आर्थिक स्थिती आणि विवेकी वित्तीय व्यवस्थापन याचा हा सुपरिणाम आहे. २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीतील आर्थिक घडामोडी, तिमाहीसाठी उपलब्ध नियत आर्थिक आकडेवारी आणि देशांतर्गत मागणीतील सातत्यपूर्ण गती भारतीय

अर्थव्यवस्थेची कणखरतेला अधोरेखित करते, असेही त्यांनी सूचित केले.

सरकारने स्पष्ट केले की, रिझर्व्ह बँक परकीय चलन बाजारावर नियमितपणे लक्ष ठेवते आणि अत्यधिक अस्थिरतेच्या परिस्थितीत हस्तक्षेप करते. चलनासाठी कोणतेही विशिष्ट उद्दिष्ट, पातळी किंवा श्रेणी तिने निश्चित केलेली नाही. परकीय चलनाची आवक वाढवण्यासाठी आणि रुपयाच्या अवमूल्यनाचा ताण कमी करण्यासाठी मध्यवर्ती बँकेने योजलेल्या उपाययोजनांचाही त्यांनी उल्लेख केला.

तेलातील घसरणीमुळे रुपया वधारला

अमेरिका आणि इराण यांच्यातील मुत्सद्दी फेरचर्चेच्या आशेमुळे तेलाच्या किमतींना लगाम बसल्याने भारतीय रुपयामध्ये किंचित सुधारणा दिसून आली. तेल तापल्यामुळे रुपया दोन महिन्यांच्या नीचांकी पातळीवर गेला होता. तथापि मंगळवारी तेलाच्या किमतीत एक टक्क्यापेक्षा जास्त घसरण झाली, परिणामी डॉलरच्या तुलनेत भारतीय चलनाचे मूल्य १२ पैशांनी (०.२ टक्के) मजबूत होऊन ९६.२४ वर स्थिरावले. परदेशातून भांडवल प्रवाहात वाढीसाठी रिझर्व्ह बँकेने योजलेल्या उपाययोजनांमुळे किती प्रमाणात निधी आकर्षित होतो, याकडेही व्यापारी बारकाईने लक्ष देत आहेत. तूर्त या उपाययोजनांमुळे अपेक्षेपेक्षा अधिक प्रमाणात ओघ झाल्याने बाजारातील सकारात्मक वातावरणाला मदत झाली.

भारताच्या बाह्य क्षेत्राबाबत बोलताना ते म्हणाले की, मार्च २०२६ च्या अखेरीस भारताचे बाह्य कर्ज ७६,२८० कोटी अमेरिकी डॉलर इतके होते, जे त्याआधीच्या वर्षी ७३,६४० कोटी अमेरिकी डॉलर होते. कर्ज परतफेड गुणोत्तर मार्च २०२५ अखेरीस ६.६ वरून मार्च २०२६ अखेरीस ५.८ पर्यंत खाली आले. १२ जून २०२६ रोजी भारताचा परकीय चलन साठा ६७,१६० कोटी डॉलर इतका होता. हा साठा १०.३ महिन्यांच्या आयातीचा खर्च भागवण्यास पुरेसा असून, मार्च २०२६ अखेरीस असलेल्या देशाच्या एकूण बाह्य कर्जापैकी ८८ टक्के कर्जाची परतफेड करण्यास सक्षम आहे.

'कॉसमॉस' मुख्यालयात नागरी सहकारी बँकांसाठी 'मिशन सक्षम'

पुणे: रिझर्व्ह बँकेच्या 'सक्षम' मिशनचा उद्देश नागरी सहकारी बँकांमधील प्रशासन, जोखीम व्यवस्थापन, हमी/अनुपालन कार्ये, कार्यप्रणाली आणि तंत्रज्ञान अवलंब (आयटी/सायबर सुरक्षेसह) यांच्या क्षमतांमधील त्रुटी दूर करणे हा आहे. मिशन नागरी सहकारी बँकांच्या विकासाचा पुढील टप्पा सुरक्षित करण्यास, अधिक सक्षम कौशल्य व क्षमता विकसित करण्यास आणि त्यांची कार्यक्षमता वाढविण्यास मदतकारक ठरणार आहे.

रिझर्व्ह बँकेने १७ जुलैला पुणे येथील कॉसमॉस को-ऑप बँकेच्या सहकार सभागृहात व्यापक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला. नागरी सहकारी बँकांचे संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि वरिष्ठ अधिकारी यांचे ज्ञान आणि क्षमता वाढविणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. या कार्यक्रमात पुणे जिल्ह्यातील ४५ नागरी सहकारी बँकांमधील १८० अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक, मंडळाचे सदस्य, व्यवस्थापकीय संचालक/मुख्याधिकारी आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सोनी इंडियाकडून 'ब्राव्हिया'च्या नव्या आवृत्तीचे अनावरण

नवी दिल्ली: सोनी इंडियाने प्रीमियम टेलिव्हिजन पोर्टफोलिओचा विस्तार करत २०२६ मधील 'फ्लॅगशिप ब्राव्हिया ९ II ट्रू आरजीबी' टेलिव्हिजन भारतीय बाजारात सादर केला आहे. कंपनीच्या अत्याधुनिक ट्रू आरजीबी डिस्प्ले तंत्रज्ञानावर आधारित हा टीव्ही अलीकडेच सादर करण्यात आलेल्या ब्राव्हिया ७ II मालिकेचा पुढचा टप्पा असून, उत्कृष्ट चित्रगुणवत्ता आणि ध्वनी अनुभवासह घरच्या घरी सिनेमागृहाचा अनुभव देण्याचा दावा कंपनीने केला आहे.

ब्राव्हिया ९ II मध्ये सोनीचे आरजीबी बॅकलाइट मास्टर ड्राइव्ह प्रो आणि एआय कॉग्निटिव्ह प्रोसेसर एक्सआर तंत्रज्ञान सामावण्यात आले आहे. स्वतंत्रपणे नियंत्रित होणाऱ्या लाल, हिरव्या आणि निळ्या (आरजीबी) एलईडीमुळे अधिक अचूक रंगसंगती, उच्च प्रकाशमानता, अधिक गडद काळा रंग आणि विस्तृत रंगछटा मिळतात. याशिवाय इमर्सिव्ह ब्लॅक स्क्रीन प्रो, आरजीबी ट्रिल्युमिनॉस मॅक्स आणि ॲकॉस्टिक मल्टी-ऑडिओ प्लस यांसारख्या वैशिष्ट्यांमुळे चित्र आणि ध्वनीचा दर्जा अधिक प्रभावी बनतो.

ब्राव्हिया ९ II आणि ब्राव्हिया ७ II या दोन्हीमध्ये डॉल्बी व्हिजन, डॉल्बी ॲटमॉस, डीटीएस : एक्स, आयमॅक्स एन्हान्स्ड, गूगल टीव्ही, ॲम्बियंट ऑप्टिमायझेशन तसेच स्टुडिओ कॅलिब्रेटेड मोड्स यांसारखी वैशिष्ट्ये उपलब्ध आहेत. ब्राव्हिया ९ II हा टीव्ही ७५ इंच आणि ८५ इंच या दोन आकारांत उपलब्ध असून त्याची सुरुवातीची किंमत ५,३९,९९० रुपये आहे. ब्राव्हिया ७ II मालिका ५५ ते ८५ इंच आकारांमध्ये उपलब्ध असून ती सोनी रिटेल स्टोअर्स, शॉपॲटएससी डॉट कॉम तसेच प्रमुख ई-कॉमर्स मंचांवर विक्रीस उपलब्ध आहे.

एसबीआय फंड्समधील हिस्सेदारी आणखी घटणार नाही - स्टेट बँकेचे अध्यक्ष

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई : आघाडीचे म्युच्युअल फंड घराणे असलेल्या एसबीआय फंड्स मॅनेजमेंटच्या नुकत्याच पार पडलेल्या प्रारंभिक समभाग विक्री अर्थात 'आयपीओ'पश्चात, त्यातील हिस्सेदारी आणखी कमी करण्याचे कोणतेही नियोजन सध्या नाही, अशी माहिती स्टेट बँकेचे अध्यक्ष सी.एस.शेट्टी यांनी मंगळवारी दिली. या कंपनीचे समभाग मंगळवारी भांडवली बाजारात सूचिबद्ध झाले.

एसबीआय फंड्स मॅनेजमेंट कंपनीतील ६ टक्के हिस्सा स्टेट बँकेने 'आयपीओ'द्वारे विकला आहे. आता स्टेट बँकेचा हिस्सा त्यामुळे ५५ टक्क्यांवर आला आहे. जागतिक पातळीवरील मालमत्ता व्यवस्थापन कंपनी अमुंडीने एसबीआय फंड्समधील ४ टक्के हिस्सा विकला असून, तिचा हिस्सा आता ३२.५ टक्क्यांवर आला आहे. 'सेबी'द्वारे घालून दिलेल्या दंडकाचे पालन करताना, दोन्ही प्रवर्तकांचा मिळून एसबीआय फंड्स मॅनेजमेंटमधील हिस्सा आता ८८ टक्क्यांवरून ७५ टक्क्यांवर आला आहे.

याबाबत शेट्टी म्हणाले की, सध्याच्या घडीला एसबीआय फंड्समधी आणखी हिस्सा विकण्याची आमची योजना नाही. सेबीच्या किमान सार्वजनिक हिश्श्याच्या नियमानुसार यापुढे हिस्सा विक्री करण्याचा निर्णय घेतला जाईल. आम्ही सुमारे दोन दशकांच्या कालावधीत हा व्यवसाय उभा केला असून, तो भांडवलावर अवलंबून नाही. भांडवली बाजारात सूचिबद्ध होण्याचा निर्णय व्यावसायिक दृष्टिकोनातून घेण्यात आला. कारण सर्व मोठ्या फंड कंपन्या भांडवली बाजारात सूचिबद्ध आहेत.

समभाग ६.२ टक्के वाढीसह सूचिबद्ध

एसबीआय फंड्स मॅनेजमेंटचा समभाग ६.२ टक्के वाढीसह मंगळवारी भांडवली बाजारात सूचिबद्ध झाला. कंपनीचे बाजारमूल्य १.२४ लाख कोटी रुपयांवर (सुमारे १३ अब्ज डॉलर) पोहोचले आहे. कंपनीचा समभाग ६०९.७५ रुपयांवर बंद झाला. यामुळे ही कंपनी देशातील दुसऱ्या क्रमांकाची मोठी मालमत्ता व्यवस्थापन कंपनी बनली आहे. प्रति समभाग ५४५ ते ५७४ रुपये किमतीला १४ जुलै ते १६ जुलै या दरम्यान पार पडलेल्या या आयपीओने गुंतवणूकदारांकडून १४० पटीहून अधिक भरणा करणारा प्रतिसाद मिळविला होता. आयपीओमध्ये यशस्वी बोली लावणाऱ्या गुंतवणूकदारांना प्रत्येकी ५७४ रुपये किमतीला हे समभाग वितरित करण्यात आले होते.

गुंवणूकदारांच्या सावध पवित्र्याने सेन्सेसला २३८ अंशांची गळती

मुंबई : पश्चिम आशियातील वाढता तणाव आणि गुंतवणूकदारांची जोखीम टाळण्याची वृत्ती, तसेच एचडीएफसी बँकेसारख्या आघाडीच्या समभागांतील सलग दुसऱ्या सत्रातील विक्रीच्या माऱ्यामुळे मंगळवारी सेन्सेक्स आणि निफ्टी हे प्रमुख निर्देशांक घसरणीसह बंद झाले. अमेरिका-इराण संघर्ष, खनिज तेलाच्या किमतीतील वाढ आणि परदेशी भांडवलाचे निर्गमन यामुळे शेअर बाजारात जोखीम टाळण्याची भावना बळावली आहे, असे विश्लेषकांनी सांगितले.

सेन्सेक्स २३८.४१ अंशांनी घसरून ७७,४७०.११ पातळीवर बंद झाला. दिवसाच्या सत्रात हा निर्देशांक ३७१.१९ अंशांनी घसरून ७७,३३७.३३ पर्यंत खाली आला होता. दुसरीकडे निफ्टी ५०.८० अंशांनी घसरून २४,१८७.७० पातळीवर बंद झाला.

भू-राजकीय आव्हाने असूनही, कॉर्पोरेट कंपन्यांच्या मजबूत कमाईच्या अपेक्षेमुळे आणि मागणीवर आधारित सकारात्मक व्यावसायिक घडामोडींच्या पाठिंब्यामुळे 'मिडकॅप' कंपन्यांच्या चांगल्या कामगिरीने घसरण मर्यादित राखली. काही मोठ्या कंपन्यांनी (लार्ज-कॅप) अपेक्षेपेक्षा चांगली तिमाही कामगिरी नोंदवल्यामुळे गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास उंचावला. यामुळे खासगी बँकिंग क्षेत्रातील कमकुवतपणामुळे निर्माण झालेली चिंता काही प्रमाणात दूर होण्यास मदत झाली.

लोकमान्य सोसायटीच्या पुणे मुख्यालयाचा तिसरा वर्धापनदिन

पुणे: लोकमान्य सोसायटीच्या पुणे मुख्यालयाचा तिसरा वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. 'लोकमान्य'चे संस्थापक अध्यक्ष डॉ. किरण ठाकूर यांनी उपस्थितांशी संवाद साधत आतापर्यंतच्या वाटचालीची माहिती दिली. उपस्थित मान्यवरांनी 'लोकमान्य'च्या सातत्यपूर्ण प्रगतीचे कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. यावेळी सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रतिष्ठेचा पहिला

'सहकार महर्षी' पुरस्कार प्राप्त झालेल्या महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रातील तज्ज्ञ, लेखक आणि राज्य सहकारी बँकेचे प्रशासकीय अध्यक्ष विद्याधर अनास्कर यांचा 'लोकमान्य'च्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. सहकार चळवळीतील त्यांच्या दीर्घकालीन योगदानाचा यावेळी गौरवपूर्वक उल्लेख करण्यात आला. याप्रसंगी डॉ. किरण ठाकूर यांनी सहकार क्षेत्रात विश्वासार्ह संस्था म्हणून आपली वेगळी ओळख 'लोकमान्य'ने निर्माण केल्याचे नमूद करत, समाजाभिमुख कार्य आणि गुणवत्तापूर्ण आर्थिक सेवा देण्याची परंपरा भविष्यातही अधिक जोमाने सुरू राहील, असा विश्वास व्यक्त केला.

यूव्ही ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड ('यूव्हीएआरसीएल')
कॉर्पोरेट कार्यालय : १३०४, चिरंजीव टॉवर, ४३, नेहरू प्लेस, नवी दिल्ली-११० ०१९

ई-लिलाव विक्री सूचना - स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलावाची जाहीर सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८(६) ची तरतूद सहवाचता सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना. याद्वारे सर्वसामान्य जनतेला आणि विशेषत: कर्जदार व जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की, सुरक्षित धनको यांच्याकडे गहाण/प्रभारित असलेली, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता, ज्याचा भौतिक ताबा सुरक्षित धनको, यूव्ही ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड (यूव्हीएआरसीएल)च्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे, ती खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि जामीनदारांकडून यूव्ही एआरसीएलची थकीत देय रक्कम वसूल करण्यासाठी दि. २५.०८.२०२६ रोजी 'जशी आहे, जे आहे' या तत्त्वावर आणि 'तिथे जे काही असेल' त्या तत्त्वावर विकली जाईल. आरक्षित किंमत आणि इसारा ठेव अनामत रक्कम (ईएमडी) संबंधित मालमत्तांच्या तपशिलासमोर दर्शविली आहे.

खातेदाराचे/ गहाण ठेवणारे यांचे नाव	दि. १६.०७.२०२६ रोजीनुसार दाव्याची रक्कम	मालमत्तांचे वर्णन	आरक्षित किंमत	इसारा ठेव (आरपीच्या १०%)	ताब्याची स्थिती
कर्जदार - श्री. श्याम ट्रेडर्स आणि त्यांचे 'जामीनदार' श्री. अमित कुमार बंका आणि श्रीमती प्रीती बंका	रक्कम रु. १०,५४,५८,५३९ (रुपये दहा कोटी चोपन्न लाख अठ्ठावन्न हजार पाचशे एकोणचाळीस फक्त), दि. १६ जुलै, २०२६ पासून पूर्ण आणि अंतिम वसुलीच्या तारखेपर्यंत, मान्य केलेल्या करारानुसार दराने चक्रवाढ पद्धतीने आकारण्यात येणाऱ्या पुढील व्याजासह, लागू होणारे दंडात्मक व्याज आणि इतर खर्चांसह एकत्रित.	मालमत्ता १ : फ्लॅट नं. ६०३, ६ वा मजला, बी-विंग, अंकुर सीएचएसएल, रोड नं. ०३ एक्सटेंशन, लिबर्टी गार्डनजवळ, मालाड वेस्ट, मुंबई- ४०००६४. सुपर बिल्ट एरिया ८१६ चौरस फूट आणि कार्पेट एरिया ६०० चौरस फूट. मालमत्ता २ : दुकान नं. ०१, ओम आशिष सीएचएसएल, लिबर्टी गार्डन, मालाड पश्चिम, मुंबई- ४०००६४, सुपर बिल्ट-अप क्षेत्रफळ ३३० चौरस फूट आणि कार्पेट क्षेत्रफळ २२० चौरस फूट.	मालमत्ता १: रु. १,१६,८८,२४० (रुपये एक कोटी सोळा लाख अठ्ठाऐंशी हजार दोनशे चाळीस फक्त) मालमत्ता २: रु. ७८,७१,५२० (रुपये अठ्ठाहत्तर लाख एकाहत्तर हजार पाचशे वीस फक्त)	मालमत्ता १ : रु. ११,६८,८२४ (रुपये अकरा लाख अडुसष्ट हजार आठशे चोवीस फक्त) मालमत्ता २ : रु. ७,८७,१५२ (रुपये सात लाख सत्त्याऐंशी हजार एकशे बावन्न फक्त.	भौतिक ताबा
कर्जदार - सॉफ्ट कॉर्नर ट्रेड ॲण्ड कॉमर्स प्रायव्हेट लिमिटेड आणि त्यांचे 'जामीनदार' श्री. आनंद सीताराम पासवान आणि श्री. दीपक पुंडलिक बोभाटे	रु. ३,९१,९१,४८५ (रुपये तीन कोटी एक्याण्णव लाख एक्याण्णव हजार चारशे पंचाऐंशी फक्त) सहमत झालेल्या करारानुसार दराने, दि. १६ जुलै, २०२६ रोजीपासून पूर्ण आणि अंतिम वसुलीच्या तारखेपर्यंत चक्रवाढ पद्धतीने आकारले जाणारे पुढील व्याज, लागू होणारे दंडात्मक व्याज आणि इतर खर्चांसह एकत्रित.	मालमत्ता १: फ्लॅट नं १५०१, आवेझ हाईट्स, १५वा मजला, एस. व्ही. रोड येथे मोगरा आंबोली, अंधेरी पश्चिम, महाराष्ट्र- ४०००५८, ९०० चौरस फूट कार्पेट एरियासह. मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई.	रु. १,५२,००,००० (रुपये एक कोटी बावन्न लाख फक्त)	रु. १५,२०,००० (रुपये पंधरा लाख वीस हजार फक्त).	भौतिक ताबा
* कर्जदार - * मेसर्स मॉन्टी इंटरनॅशनल आणि त्यांचे जामीनदार सुश्री दीप्ती बाविक शाह, श्री. भाविक नरेंद्र शाह आणि श्री. नरेंद्र पानचंद शाह.	रु. ४,९९,३८,८३९ (रुपये चार कोटी नव्याण्णव लाख अडतीस हजार आठशे एकोणचाळीस फक्त) सहमत झालेल्या करारानुसार दराने, दि. १६ जुलै, २०२६ रोजीपासून चक्रवाढ पद्धतीने, पूर्ण आणि अंतिम वसुलीच्या तारखेपर्यंत, लागू होणारे दंडात्मक व्याज आणि इतर खर्चांसह एकत्रित.	मालमत्ता १: दुकान क्र. ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १० आणि स्टोअर क्र. ३, ४, ५, ६, ७, ८, तळमजला, डी विंग, शिवशाही कॉम्प्लेक्स, येथे गाव नारायणगाव, कल्याण अहमदनगर रोड, डीके हॉटेल आणि ॲशविल वर्ल्ड स्कूलजवळ, ता. मुरबाड, जि. ठाणे ४२१४०१.	रु. १,७८,९८,५७० (रु. एक कोटी अठ्ठाहत्तर लाख अठ्ठाण्णव हजार पाचशे सत्तर फक्त) 'प्रत्येक मालमत्तेसाठी स्वतंत्र लिलाव आयोजित केले जातील. प्रत्येक मालमत्तेचा आरपी आणि ईएमडी तपशील खाली नमूद केलेल्या वेबसाइट्सवर उपलब्ध असलेल्या अटी व शर्तींमध्ये उपलब्ध आहे.'	रु. १७,८९,८५७ (रुपये सतरा लाख एकोणनव्वद हजार आठशे सत्तावन्न फक्त.)	भौतिक ताबा
कर्जदार- सृष्टी अर्जुन सोनी (मालकी) आणि त्याचे जामीनदार सृष्टी अर्जुन सोनी आणि अर्जुन देवेंद्रकुमार सोनी	रु. २,४४,३८,९८३ (रुपये दोन कोटी चव्वेचाळीस लाख अडतीस हजार नऊशे त्र्याऐंशी फक्त) सहमत झालेल्या करारानुसार दराने, दि. १६ जुलै, २०२६ रोजीपासून चक्रवाढ पद्धतीने, पूर्ण आणि अंतिम वसुलीच्या तारखेपर्यंत, लागू होणारे दंडात्मक व्याज आणि इतर खर्चांसह एकत्रित.	मालमत्ता म्हणजे कमर्शियल युनिट नं. १, २, स्टिट फ्लोअर, सीटीएस क्र. १०६२, १०६३ रत्नमनोहर संकुल, सुंदर नारायण मंदिरासमोर, रविवार पेठ परिसरात, मोजमापे कार्पेट एरिया १०७.७ चौ. मीटर नाशिक ता. आणि जि. नाशिक यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल.	रु. १,०८,००,००० (रुपये एक कोटी आठ लाख फक्त)	रु. १०,८०,००० (रुपये दहा लाख ऐंशी हजार फक्त)	भौतिक ताबा

मालमत्तेच्या तपासणीची तारीख आणि वेळ : खाली नमूद केलेल्या वेबसाइट्सवर उपलब्ध असलेल्या विक्रीच्या घोषणेमध्ये नमूद केल्याप्रमाणे.
ईएमडी जमा करण्याची अंतिम तारीख आणि वेळ : दि. २५.०८.२०२६ रोजीपासून लिलाव संपेपर्यंत.
ई-लिलावाची तारीख आणि वेळ : दि. २५.०८.२०२६ दुपारी ०४.०० वा. ते सायं. ०५.०० वा. दरम्यान.

अटी व शर्ती :
१. लिलाव केवळ http://baanknet.com यावर उपलब्ध असलेल्या ऑनलाइन इलेक्ट्रॉनिक बोली (ई-लिलाव) प्लॅटफॉर्मद्वारे आयोजित केला जाईल. इच्छुक बोलीदारांना सल्ला दिला जातो की, ई-लिलाव प्रक्रियेत सहभागी होण्यापूर्वी त्यांनी सुरक्षित धनकोच्या वेबसाइटवर (https://www.uvarcl.com) आणि ई-लिलाव पोर्टलवर (http://baanknet.com) उपलब्ध असलेल्या विक्रीच्या सविस्तर अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचाव्यात.
२. ई-लिलावासाठी नोंदणी: इच्छुक बोलीदारांनी https://baanknet.com येथील ई-लिलाव पोर्टलवर स्वतःची नोंदणी करावी. इच्छुक बोलीदार, सेवा प्रदाता, **पीएसबी अलायन्स प्रायव्हेट लिमिटेड** यांच्यामार्फत बँकनेट पोर्टलवर उपलब्ध असलेले ई-लिलाव प्रक्रियेचे ऑनलाइन प्रशिक्षणदेखील घेऊ शकतात.
३. सदर मालमत्तेवर कोणतेही ज्ञात दायित्वे/बोजा आणि दावे नाहीत. मालमत्तेचा लिलाव 'जशी आहे तशी आहे', 'जे आहे ते आहे' आणि 'तिथे जे काही उपलब्ध आहे त्या आधारावर' केला जाईल.
४. **संपर्क तपशील :** अधिक माहितीसाठी, कृपया यूव्हीएआरसीएल यांच्या अधिकृत अधिकाऱ्याशी ८७७९५०७३४७ किंवा ९६१९१४९०२४ या क्रमांकावर सकाळी १०.०० वा. ते सायं. ५.०० वा. वेळेत संपर्क साधा, किंवा आम्हाला resolutionteam@uvarcl.com किंवा uvarcl@gmail.com यावर ईमेल करा. लिलाव प्रक्रियेसंबंधित कोणत्याही प्रश्नांसाठी, तुम्ही सेवा प्रदात्याशी संपर्क साधू शकता, पीएसबी अलायन्स प्रायव्हेट लिमिटेड (बँकनेट सपोर्ट टीम), यांच्याशी ८२९१२२०२२० या क्रमांकावर किंवा support.baanknet@psballiance.com या ईमेलवर संपर्क साधा.

वरील निर्देशित कर्जाच्या कर्जदार/जामीनदार/गहाण ठेवणारे यांना, त्यांची थकबाकी पूर्णपणे परतफेड न झाल्यास, वर नमूद केलेल्या तारखेला सदर ही विक्री आयोजित करण्याबाबतची ही सूचनादेखील आहे.

दिनांक : २२.०७.२०२६
ठिकाण : नवी दिल्ली

सही/- अधिकृत अधिकारी
(यूव्ही ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड)

Hinduja Housing Finance Limited

हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड
कॉर्पोरेट कार्यालय 167-169, 2रा मजला, लिटल माउंट, सैदापेट, चेन्नई – 600015. (तामिळनाडू) .
ई-मेल आयडी: auction@hindujahousingfinance.com

ई-लिलाव सह विक्रीसाठी सार्वजनिक सूचना (परिशिष्ट- IV A) (नियम 8 (6) आणि 9(1))

हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (HHF), **कॉर्पोरेट कार्यालय : 167-169, दुसरा मजला, लिटल माउंट, सैदापेट, चेन्नई – 600015, (तामिळनाडू). ई-मेल : auction@hindujahousingfinance.com शाखा कार्यालय : प्लॉट क्र. 119, विठ्ठल शॉपिंग कॉम्प्लेक्स, ओंकारेश्वर मंदिराजवळ, जय नगर, जळगाव – 425001. शाखा कार्यालय : तिसरा मजला, रगबीर चेंबर्स, हॉटेल अंगीठीच्या शेजारी, विद्या नगर, 7 हिल्स, जालना रोड, औरंगाबाद – 431001, महाराष्ट्र. शाखा कार्यालय : शॉप क्र. 7 व 8, पद्मविश्वा रीजन्सी, चौथा मजला, जुने मानवता कॅन्सर हॉस्पिटलजवळ, सरोज ट्रॅव्हल्सच्या मागे, मुंबई नाका, नाशिक – 422003, महाराष्ट्र.** यांचेकडे तारण असलेल्या **अचल मालमत्तेची सिक्युरिटायझेशन ॲंड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल असेट्स ॲंड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२** (यापुढे "अधिनियम") अंतर्गत विक्री. ज्याअर्थी, HHFL च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी पुढील कर्ज खात्यांमध्ये सदर अधिनियमातील अनुच्छेद १३(२) अंतर्गत जारी केलेल्या सूचनांच्या अनुषंगाने पुढील मालमत्तांचा **सांकेतिक / प्रत्यक्ष ताबा** घेतलेला आहे. ही विक्री **https://www.bankeauctions.com** या वेबसाईटवर दिलेल्या ई-लिलाव मंचाच्या माध्यमातून करण्यात येईल.

मालमत्तेची तपासणीची तारीख	बयाना रक्कमेची दिनांक	ई-लिलाव दिनांक / वेळ
01-08-2026 11.00 तास -14.00 तास	27-08-2026 सायंकाळी 5 वाजेपर्यंत.	28-08-2026 11:00 तास-13:00 तास

अ. क्र.	कर्जदार / सह-कर्जदार / हमीदार / कर्ज खाते क्र.	मागणी सुचनेचा दिनांक व रक्कम	अचल मालमत्तेचे वर्णन / सुरक्षित संपत्ती	ताबा दिनांक	आरक्षित किंमत / बयाना रक्कम
1.	1. श्री. ज्ञानेश्वर नानाभाऊ घोडके (कर्जदार) 2. सौ. सोनाली रामदास मिसाळ (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र. MH/ARG/AURA/A000000580	08-12-2025 रोजी 06-12-2025 रु. 19,51,695/- बोली वाढीव रक्कम: रु. 10,000/- (रुपये दहा हजार फक्त)	सर्व भाग आणि तुकडा निवासी युनिट बेअरिंग प्लॉट नं. 43, बांधलेला क्षेत्रफळ एरिया 700.00 चौ.फु. गट नं. 370, आर डी बुक नं. 598, मौजा चिखथाना येथे स्थित, ता आणि जि. औरंगाबाद, छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेच्या हद्दीत आणि चतुर्सिमा - पुर्व - प्लॉट नं. 42, पश्चिम - प्लॉट नं. 44, दक्षिण - प्लॉट नं. 32, उत्तर - 20.00फु. रोड	03-03-2026 सांकेतिक; या दिनांकास एकूण थकबाकी रु. 19,68,999/- 15-07-2026 पर्यंत	रु. 22,75,200/-; बयाना रक्कम रु. 2,27,520/-
2.	1. श्री. भारतलाल पहलाजराम तलरेजा (कर्जदार) 2. सौ. मीना भारतलाल तलरेजा (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र.: MH/ARG/AURA/A000000381	08-01-2026 रोजी 06-01-2026 रु. 22,52,739/- बोली वाढीव रक्कम: रु. 10,000/- (रुपये दहा हजार फक्त)	रहिवीस युनिटचा सर्व भाग आणि तुकडा फ्लॅट नं. 6, बिल्ट अप एरिया क्षेत्रफळ 47.30 चौ.मी, दुसरा मजला ''श्री रेनुका माता निवास'' या नावाने ओळखली जानारी बिल्डिंग, प्लॉट नं. 26-ए आणि 30-ए वरील बांधकाम बेअरिंग ग्राम पंचायत नं. 3226, क्षेत्रफळ 260.70 चौ.मी., गट नं. 153 (भाग), रा. सातारा ता आणि जि. औरंगाबाद, औरंगाबाद महानगरपालिका च्या हद्दीत, औरंगाबाद एग्रीमेंट सेल प्रमाने चतुर्सिमा:- पुर्व: जिना आणि फ्लॅट नं. 7, पश्चिम: फ्लॅट नं. 5, उत्तर: सोहम अपार्टमेंट , दक्षिण: टॉवर नं. 5 आणि बाल्कणी	07-07-2026 प्रत्यक्ष; या दिनांकास एकूण थकबाकी रु. 24,13,854/- 15-07-2026 पर्यंत	रु. 17,81,500/-; बयाना रक्कम रु. 1,78,150/-
3.	1. श्री. भारतलाल पहलाजराम तलरेजा (कर्जदार) 2. सौ. मीना भारतलाल तलरेजा (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र.: MH/ARG/AURA/A000000393	08-01-2026 रोजी 06-01-2026 रु. 22,52,748/- बोली वाढीव रक्कम: रु. 10,000/- (रुपये दहा हजार फक्त)	रहिवीस युनिटचा सर्व भाग आणि तुकडा फ्लॅट नं. 9, बिल्ट अप एरिया क्षेत्रफळ 47.30 चौ.मी, तीसरा मजला ''श्री रेनुका माता निवास'' या नावाने ओळखली जानारी बिल्डिंग, प्लॉट नं. 29-ए आणि 30-ए वरील बांधकाम बेअरिंग ग्राम पंचायत नं. 3229, क्षेत्रफळ 290.70 चौ.मी., गट नं. 153 (भाग), रा. सातारा ता आणि जि. औरंगाबाद, औरंगाबाद महानगरपालिका च्या हद्दीत, औरंगाबाद एग्रीमेंट सेल प्रमाने चतुर्सिमा:- पुर्व: जिना आणि फ्लॅट नं. 10, पश्चिम: फ्लॅट नं. 8, उत्तर: सोहम अपार्टमेंट , दक्षिण: टॉवर नं. 8 आणि बाल्कणी	08-07-2026 प्रत्यक्ष; या दिनांकास एकूण थकबाकी रु. 24,13,863/- 15-07-2026 पर्यंत	रु. 17,81,500/-; बयाना रक्कम रु. 1,78,150/-
4.	1. श्री. शिवाजी फकीरा कोली (कर्जदार), 2. श्रीमती.पुष्पा शिवाजी कोली (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र. MH/JGN/JLGN/A000000884	12-02-2026 रोजी 10-02-2026 रु. 10,14,090/- बोली वाढीव रक्कम: रु. 10,000/- (रुपये दहा हजार फक्त)	संपत्तीचा सर्व भाग आणि तुकडा बांधलेले घर सीटीएस नं. 827 (जीपी नं. 431) एकुण क्षेत्रफळ एरिया 192.50चो.मी. रा. चांगदेव येथे स्थित उपनिबंधक ऑफिस मुक्ताई नगर (एदलाबाद) च्या हद्दित, ता. मुक्ताईनगर जि. जळगाव, चतुर्सिमा - पुर्व - हरी जयराम महाजन यांची मालमत्ता, पश्चिम - नंद